# वसई विरार शहर महानगरपालिका
# वैद्यकीय आरोग्य विभाग

दि.०३/१२/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

राज्यात दि.४ डिसेंबर २०२४ रोजी राष्ट्रीय जंतनाशक दिन व दि.१० डिसेंबर २०२४ रोजी मॉप् अप दिन मोहिम राबविण्यात येणार असून या दिवशी १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळीचे वाटप करून त्यांचे आरोग्य चांगले ठेवणे, पोषण स्थिती , शिक्षण व जीवनाचा दर्जा उंचावणे हा या राष्ट्रीय जंतनाशक दिनाचा उददेश आहे. वसई विरार महानगरपालिका क्षेत्रातही सदर मोहिम राबविण्यात येत आहे.

सदर मोहिम शाळा, अंगणवाडी व महाविद्यालये या संस्थामध्ये राबविण्यात येणार आहे. १ ते १९ वर्षे वयोगटातील सर्व मुला-मुलींना जंतनाशक गोळी (Tab Albendazole) देण्यात येईल.

❖ **<u>महत्वाचे</u>**

- १ वर्षाखालील लाभार्थ्यांना अल्बेंडॉझोलची गोळी देण्यात येऊ नये.
- सर्व अंगणवाडी केंद्रावर १ ते ६ वर्ष वयोगटातील सर्व बालकांना जंतनाशक गोळी देण्यात येणार आहे. तसेच ६ ते १९ वर्ष वयोगटातील शालाबाहय मुला-मुलींना जंतनाशक गोळी देण्यात येईल.
- ए.एन.एम व आशा यांच्यामार्फत १ ते ६ वर्ष वयोगटातील बालकांना व ६ ते १९ वर्ष वयोगटातील शालाबाहय मुला- मुलींना शाळेत किंवा अंगणवाडी केंद्रावर घेऊन जातील.
- ज्या मुला-मुलींना दि.०४ डिसेंबर २०२४ रोजी जंतनाशक गोळी दिली नसेल त्यांना दि.१० डिसेंबर २०२४ रोजीच्या मॉप- अप दिनी गोळी देण्यात येईल.

वैद्यकीय आरोग्य विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका